## सापळा केस

दिनांक १५/०२/२०१९

**मुकूंदराज भिमाशंकर कलशेट्टी, स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, जायकवाडी पाठबंधारे उपविभाग क्रमांक ६,पाथरी, ता.पाथरी,.जि. परभणी यांनी ४,०००/— रू. लाचेची रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले.**

यातील तक्रारदार यांनी दिनांक १४/०२/२०१९ रोजी ॲसीबी कार्यालय परभणी येथे तक्रार दिली की, त्यांचे शेतातील ऊसाला कालव्याचे राखीव पाणी सोडण्यासाठी जायकवाडी कार्यालयातील स्थापत्य अभियंता कलशेट्टी, ता. पाथरी, जि. परभणी हे ४,०००/—रूपये लाचेची मागणी करीत आहेत, त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

त्यांचे तक्रारीवरून, ब्युरो कडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक १५/०२/२०१९ रोजी लोकसेवक मुकूंदराज भिमाशंकर कलशेट्टी, स्थापत्य अभियांत्रीकी सहायक, जायकवाडी पाठबंधारे उपविभाग क्रमांक ६,पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी यांनी तक्रारदार यांना त्यांचे सदर कामासाठी ४,०००/— रू. लाचेची मागणी करून जायकवाडी पाठबंधारे उपविभाग पाथरी कार्यालयात ४,०००/—रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. लाचेची रक्कम त्यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आली आहे. त्यांचे विरूध्द पो.स्टे.पाथरी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.संजय लाटकर, नांदेड परिक्षेत्र नांदेड, अपर पोलीस अधीक्षक, श्री नुरमहंमद शेख यांचे मार्गदर्शनाखाली, श्री गजानन विखे पोलीस उप अधीक्षक, पोह/लक्ष्मण मुरकूटे, पोशि/सचिन धबडगे, अविनाश पवार, माणिक चट्टे, पोह/जमील जहागीरदार, पोना/शेख मुखीद, चालक भालचंद्र बोके, नितीन काळे, मपोशि सारीका टेहरे, सावित्री टडवते आणि ॲ.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी भ्रष्टाचाराविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन अपर पोलीस अधीक्षक श्री नुरमहंमद शेख, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांनी केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२—२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

श्री.संजय लाटकर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड :— ०२४६२—२५५८११
श्री नुरमहंमद शेख, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.परभणी — ९८२३३९०३३३
श्री गजानन विखे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.परभणी— ९९२२५४७८९८
श्री.अनिल गव्हाणकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी — ९८२३६१६१४५
श्री.विवेकानंद भारती, पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.परभणी — ९४२३४२९७८६

अपर पोलीस अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,परभणी

Scanned by CamScanner